।। सा विद्या या विमुक्तये ।।
# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपूरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
## SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड.

**Office of the Director,Board of Examinations & Evaluation**
**Phone: (02462) 229294 website: srtmun.ac.in e-mail: directorboee@srtmun.ac.in**

जा.क्र.परीक्षा/संपवमूमं/२०२०-२१/९७५ दिनांक १५/०२/२०२१

**परिपत्रक**

प्रति,
**मा. प्राचार्य,**
सर्व संलग्नीत महाविद्यालये
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय : हिवाळी २०२० परीक्षेसाठी महाविद्यालय क्लस्टर पध्दतीने परीक्षा घेणेबाबत.**

महोदय,

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, दि. १९/०१/२०२१ व दि. ११/०२/२०२१ रोजी संपन्न झालेल्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या ठरावानुसार तसेच दि. २२/०१/२०२१ रोजीच्या विद्या परिषदेच्या मान्यतेनुसार प्रस्तुत विद्यापीठाच्या हिवाळी २०२० परीक्षेची कार्यपध्दती खालील प्रमाणे निश्चित केली आहे.

1. प्रस्तुत विद्यापीठाच्या हिवाळी २०२० परीक्षा हया बहुपर्यायी (एम.सी.क्यु) प्रश्नपत्रिकेव्दारे ऑफलाईन व ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहेत.
2. हिवाळी-२०२० परीक्षेच्या पदवी अभ्यासक्रमाकरीता ४० बहुपर्यायी (एम.सी.क्यु) प्रश्नांची प्रश्नपत्रिका असेल. त्यासाठी ०१ तासाचा कालावधी राहील. प्रत्येक प्रश्नासाठी १ गुण असेल. ४० गुणांपैकी प्राप्त गुण संबंधीत विषयाच्या कमाल गुणानुसार रुपांतरीत करुन निकाल तयार करण्यात येईल. तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रम व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या (एम.बी.ए., अभियांत्रिकी, विधी व औषधनिर्माणशास्त्र) परीक्षेसाठी बहुपर्यायी (एम.सी.क्यु) प्रश्नांची प्रश्नपत्रिका असेल. त्यात ५० प्रश्न असतील, त्यापैकी विद्यार्थ्यांनी ४० प्रश्ने सोडविणे अनिवार्य राहील. त्यासाठी एक तासाचा कालावधी असेल. प्रत्येक प्रश्नासाठी १ गुण असेल. ४० गुणांपैकी प्राप्त गुण संबंधीत विषयाच्या कमाल गुणानुसार रुपांतरीत करुन निकाल तयार करण्यात येईल.
3. हिवाळी-२०२० परीक्षेसाठी पदवी तीन वर्षीय अभ्यासक्रमातील प्रथम व व्दितीय वर्ष व चार वर्षीय पदवी अभ्यासक्रमासाठी प्रथम, व्दितीय व तृतीय वर्ष तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या परीक्षा महाविद्यालय स्तरावर क्लस्टर पध्दतीने घेण्यात येतील. अभ्यासक्रमनिहाय तयार केलेली क्लस्टर महाविद्यालयाची यादी **"परिशिष्ट" अ** नुसार आहे.

4. हिवाळी-२०२० परीक्षेसाठी पदवी अभ्यासक्रमाच्या तीन वर्षीय अभ्यासक्रमाच्या तृतीय वर्षाच्या, चार वर्षीय पदवी अभ्यासक्रमाच्या चतुर्थ वर्षाच्या व पाच वर्षीय अभ्यासक्रमाच्या पाचव्या वर्षाच्या आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या व्दितीय वर्षाच्या म्हणजेच पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाच्या दोन्ही सत्राच्या (नियमित व बॅकलॉग विद्यार्थ्याच्या) परीक्षा हया विद्यापीठामार्फत बहुपर्यायी (एम.सी.क्यु) ऑनलाईन/ऑफलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहेत.

5. हिवाळी-२०२० परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी क्लस्टर हेड महाविद्यालयास आवश्यक ते वित्तीय आणि मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यात येणार असुन, क्लस्टरहेड महाविद्यालयासाठी परीक्षा विषयक सर्व खर्चास वित्तीय मान्यता देण्यात येईल. याबाबतची सविस्तर माहिती क्लस्टरहेड महाविद्यालयास कळविण्यात येईल.

6. पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेचे पेपर सेटींगचे काम परीक्षा विभागामार्फत पुर्ण करण्यात येणार आहे व महाविद्यालय स्तरावर घेण्यात येणा-या परीक्षेचे पेपर सेटींग हे क्लस्टर हेड महाविद्यालयाने इतर महाविद्यालयांच्या सहकार्याने पुर्ण करावेत.

7. क्लस्टर हेड महाविद्यालयांनी सर्व क्लस्टर महाविद्यालयांतील प्राचार्यांची बैठक घेवुन अभ्यासक्रमनिहाय वेळापत्रक निश्चीत करावेत. याची माहिती सर्व संबंधीत महाविद्यालयांच्या संकेतस्थळावर/ सूचनाफलकावर परीक्षेच्या किमान पंधरा दिवस अगोदर प्रकाशित करावी. त्याची एक प्रत परीक्षा विभागास पाठविण्यात यावी. प्रश्नपत्रीका तयार करण्याची जबाबदारी क्लस्टरहेड महाविद्यालयाने त्याच्या क्लस्टरमध्ये असलेल्या महाविद्यालयांना विभागून देतील.

8. क्लस्टरहेड महाविद्यालयाने वेळापत्रकानुसार क्लस्टरमधील महाविद्यालयांच्या परीक्षेसाठी अभ्यासक्रमनिहाय प्रश्नपत्रिका पुरेशा कालावधी अगोदर देण्यात/ पाठविण्यात याव्यात.

9. महाविद्यालय स्तरावर परीक्षा संपन्न झाल्यानंतर दररोज उत्तरपत्रिकांची तपासणी त्या त्या महाविद्यालयाने पूर्ण करावी. पेपर तपासणी झाल्यानंतर परीक्षा विभागामार्फत पुरविण्यात येणा-या ऑनलाईन लिंकव्दारे गुण भरणे सर्व महाविद्यालयांना अनिवार्य राहील. महाविद्यालय स्तरावर घेण्यात आलेल्या परीक्षांच्या सर्व उत्तरपत्रिका हया परीक्षेच्या दर तीन दिवसानंतर जिल्हा/तालुका उत्तरपत्रिकां संकलन केंद्रावर जमा कराव्यात.

10. हिवाळी-२०२० पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या ऑफलाईन पध्दतीने घेण्यात येणा-या परीक्षा हया विद्यापीठाने निर्धारित केलेल्या चारही जिल्हयातील परीक्षा केंद्रावर घेण्यात येणार आहेत.

11. पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा हया विद्यापीठामार्फत घेण्यात येणार असल्यामुळे ऑफलाईन पध्दतीने घेण्यासाठी उत्तरपत्रिका (ओ.एम.आर सिट) सर्व परीक्षा केंद्राना परीक्षा विभागामार्फत पुरविण्यात येतील. या सर्व उत्तरपत्रिकां परीक्षा संपल्यानंतर विद्यापीठाने निर्धारित केलेल्या जिल्हा/तालुकानिहाय उत्तरपत्रिका संकलन केंद्रावर सर्व परीक्षा केंद्र प्रमुखांनी दररोज पाठविणे बंधनकारक राहील व या सर्व उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन केंद्रीय पध्दतीने विद्यापीठातील केंद्रीय मूल्यांकन केंद्राव्दारे करण्यात येईल.

12. महाविद्यालयीनस्तरावर ऑफलाईन पध्दतीने घेण्यात येणा-या परीक्षेसाठी ओ.एम.आर. उत्तरपत्रिकांच्या झेरॉक्स काढून त्या वापरण्यात याव्यात. उत्तरपत्रिकेवर अनुक्रमांक महाविद्यालयाच्या सांकेतांक क्रमांकाप्रमाणे नोंदवावा (उदा. म.सां.क्र. १०१/००१, ००२, ००३).

13. क्लस्टर प्रणालीव्दारे हिवाळी-२०२० परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी सर्व संलग्नीत महाविद्यालयांचे प्राचार्यांची/क्लस्टर हेड यांची लवकरच बैठक आयोजित करण्यात येणार आहे.

14. हिवाळी-२०२० परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना त्यांच्या उत्तरपत्रिकांचे पुनर्मुल्यांकन/ गुण पडताळणीची सुविधा उपलब्ध असेल.

15. हिवाळी-२०२० परीक्षा घेतांना शासनाने वेळोवेळी निर्देशीत केलेल्या कोवीड-१९ विषाणुचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी दिलेल्या सूचनांचे पालन करणे सर्व परीक्षा केंद्र प्रमुख, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांना बंधनकारक राहील.
16. महाविद्यालय क्लस्टरमार्फत परीक्षा घेतांना सर्व पातळीवर परीक्षा कामाची गोपनियता पाळणे व परीक्षा कार्यात कोणताही अडथळा निर्माण होणार नाही याची जबारदारी सर्व महाविद्यालयांवर राहील.
17. क्लस्टर महाविद्यालयामार्फत प्रश्नसंच तयार करणेसाठी संबधीत विषय शिक्षकांना प्रचलित दराप्रमाणे मानधन देय राहिल व यासाठी महाविद्यालय प्राचार्यांनी पेपर सेटींग तयार करणेसाठी दिलेले कार्यालयीन आदेश देयकासोबत जोडणे आवश्यक राहिल.
18. हिवाळी-२०२० परीक्षा ऑनलाईन किंवा ऑफलाईन पध्दतीने देणेसाठी विद्यार्थ्यांने संमतीपत्र भरुन देणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यास ऑनलाईन परीक्षा देतांना कोणतेही अडचण निर्माण झाल्यास सदर विद्यार्थ्याची कोणत्याही परिस्थितीत पूनर्परिक्षा घेतली जाणार नाही. तसेच संमती पत्राव्दारे ऑनलाईन किंवा ऑफलाईन पध्दतीने भरून दिलेला पर्याय अंतीम समजला जाईल. दिलेला पर्याय कोणत्याही परिस्थीत बदलता येणार नाही.
19. हिवाळी-२०२० परीक्षा ही ऑनलाईन पध्दतीने विद्यार्थी त्यांच्या मोबाईलव्दारे देवू शकतील, तसेच ऑफलाईन परीक्षा हि विद्यापीठाने निर्धारित केलेल्या परीक्षा केंद्रावर ओ.एम.आर. उत्तरपुस्तीकेव्दारे घेण्यात येईल.
20. ऑनलाईन परीक्षा देणेसाठी स्मार्टफोन, लॅपटॉप, संगणक, इंटरनेट कनेक्टीवीटीची सोय करण्याची जबाबदारी ही संबधीत विद्यार्थ्याची राहिल.
21. प्रस्तुत विद्यापीठाच्या नांदेड,लातूर,परभणी येथील सर्व संकुले व न्यू मॉडेल डिग्री कॉलेज हिंगोली, कै. उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट येथे चालणा-या सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षा हया संकुल/महाविद्यालयीन स्तरावर घेण्यात येणार आहेत.

सबब, वरील प्रमाणे महाविद्यालय क्लस्टर नुसार हिवाळी २०२० परीक्षा घेणेबाबत सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचा-यांना हि बाब निदर्शनास आणुन दयावी व घेवुन परीक्षा सुरळीत पार पाडणेसाठी सहकार्य करावे.

आपला,

**प्र-संचालक**
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रत माहितीस्तव :**
मा. कुलगुरु महोदय, प्रस्तुत विद्यापीठ.
मा.प्र-कुलगुरु महोदय, प्रस्तुत विद्यापीठ.
मा. वित्त व लेखाधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ.
मा.कुलसचिव, प्रस्तुत विद्यापीठ.

**प्रत माहितीस्तव व कार्यवाहीस्तव:**
उपकुलसचिव, सहा.कुलसचिव, अधिक्षक, सहा.अधिक्षक-परीक्षा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.

# परिशिष्ठ "अ"

## स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

## अधिष्ठाता मंडळात विद्याशाखानिहाय तयार केलेल्या क्लस्टर समुह प्रस्तावित

### वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखा :

| अ.क्र | अभ्यासक्रम | क्लस्टर क्षेत्र | क्लस्टर हेड |
|---|---|---|---|
| १ | BBA | विद्यापीठ परिक्षेत्रातील ४ जिल्हे | प्राचार्य, आय.टी.एम कॉलेज, नांदेड. |
| २ | MBA | विद्यापीठ परिक्षेत्रातील ४ जिल्हे | संचालक, वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र संकुल, विद्यापीठ परिसर. |
| ३ | B.Com & M.Com | नांदेड जिल्हा | प्राचार्य, पीपल्स कॉलेज, नांदेड |
| ४ | B.Com & M.Com | परभणी जिल्हा | प्राचार्य, कै.कमलताई जामकर महिला महाविद्यालय, परभणी |
| ५ | B.Com & M.Com | लातूर जिल्हा | प्राचार्य, दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर |
| ६ | B.Com & M.Com | हिंगोली जिल्हा | प्राचार्य, बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमत |

### मानव्य विज्ञान विद्याशाखा :

| अ.क्र | अभ्यासक्रम | क्लस्टर क्षेत्र | क्लस्टर हेड |
|---|---|---|---|
| १ | BA, MA सर्व विषय | नांदेड, लोहा, कंधार, अर्धापूर, मुदखेड तालुक्यातील सर्व महाविद्यालये | प्राचार्य, नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय, नांदेड. |
| २ | BA, MA सर्व विषय | किनवट, माहूर, हिमायतनगर, भोकर, हदगाव तालुक्यातील सर्व महाविद्यालये | प्राचार्य, दिगंबरराव बिंदू महाविद्यालय, भोकर |
| ३ | BA, MA सर्व विषय | धर्माबाद, बिलोली, नायगांव, उमरी तालुक्यातील सर्व महाविद्यालये | प्राचार्य, शरदचंद्र कला व वाणिज्य महाविद्यालय, नायगांव |
| ४ | BA, MA सर्व विषय | देगलूर, मुखेड तालुक्यातील सर्व महाविद्यालये | प्राचार्य, देगलूर महाविद्यालय, देगलूर |
| ५ | BA, MA सर्व विषय | लातूर, औसा, रेणापूर, निलंगा, शिरूर अनंतपाळ, चाकूर तालुक्यातील सर्व महाविद्यालये | प्राचार्य, दयानंद कला महाविद्यालय, लातूर. |
| ६ | BA, MA सर्व विषय | उदगीर, देवणी, जळकोट, अहमदपूर, तालूक्यातील सर्व महाविद्यालये | प्राचार्य, उदयगिरी महाविद्यालय, उदगीर. |
| ७ | BA, MA सर्व विषय | परभणी जिल्हयातील सर्व महाविद्यालये | प्राचार्य, श्री. शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, परभणी |
| ८ | BA, MA सर्व विषय | हिंगोली जिल्हा | प्राचार्य, शिवाजी महाविद्यालय, हिंगोली |
| ९ | LLB | विद्यापीठ परिक्षेत्रातील ४ जिल्हे | प्राचार्य, नारायणराव चव्हाण विधी महाविद्यालय, नांदेड |
| १० | LLM | विद्यापीठ परिक्षेत्रातील ४ जिल्हे | प्राचार्य, शिवाजी विधी महाविद्यालय, परभणी |
| ११ | BSL, DTL | विद्यापीठ परिक्षेत्रातील ४ जिल्हे | प्राचार्य, दयानंद विधी महाविद्यालय, लातूर |

### विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा :

| अ.क्र | अभ्यासक्रम | क्लस्टर क्षेत्र | क्लस्टर हेड |
|---|---|---|---|
| १ | B.Sc. & M.Sc. | नांदेड, लोहा, कंधार, अर्धापूर, मुदखेड तालुक्यातील सर्व महाविद्यालये | प्राचार्य, सायन्स कॉलेज, नांदेड. |
| २ | B.Sc. & M.Sc. | किनवट, माहूर, हिमायतनगर, भोकर, हदगाव तालुक्यातील सर्व महाविद्यालये | प्राचार्य, बळीराम पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, किनवट |
| ३ | B.Sc. & M.Sc. | धर्माबाद, बिलोली, नायगांव, उमरी तालुक्यातील सर्व महाविद्यालये | प्राचार्य, शंकरराव चव्हाण महाविद्यालय, शंकरनगर |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | B.Sc. & M.Sc. | देगलूर, मुखेड तालुक्यातील सर्व महाविद्यालये | प्राचार्य, ग्रामीण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वसंतनगर, मुखेड |
| ५ | B.Sc. & M.Sc. | लातूर, औसा, रेणापूर, निलंगा, शिरूर अनंतपाळ, चाकूर तालुक्यातील सर्व महाविद्यालये | प्राचार्य, दयानंद विज्ञान महाविद्यालय, लातूर. |
| ६ | B.Sc. & M.Sc. | उदगीर, देवणी, जळकोट, अहमदपूर, तालूक्यातील सर्व महाविद्यालये | प्राचार्य, शिवाजी महाविद्यालय, उदगीर. |
| ७ | B.Sc. & M.Sc. | परभणी जिल्हा | प्राचार्य, ज्ञानोपासक कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, परभणी |
| ८ | B.Sc. & M.Sc. | हिंगोली जिल्हा | प्राचार्य, आदर्श महाविद्यालय, हिंगोली |
| ९ | B.Pharm. | लातूर व परभणी जिल्हयातील सर्व फार्मसी महाविद्यालये | प्राचार्य, चन्ना बसवेश्वर फार्मसी महाविद्यालय, लातूर |
| १० | B.Pharm. | नांदेड व हिंगोली जिल्हयातील सर्व फार्मसी महाविद्यालये | प्राचार्य, नांदेड फार्मसी कॉलेज, नांदेड |
| ११ | M.Pharm. | विद्यापीठ परिक्षेत्रातील ४ जिल्हे | संचालक, स्कूल ऑफ फार्मसी, विद्यापीठ परिसर |

## आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा :

| अ.क्र | अभ्यासक्रम | क्लस्टर क्षेत्र | क्लस्टर हेड |
|---|---|---|---|
| १ | शिक्षणशास्त्र | नांदेड जिल्हयातील सर्व शिक्षणशास्त्र महाविद्यालये | प्राचार्य, सहयोग शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नांदेड. |
| २ | शिक्षणशास्त्र | परभणी जिल्हयातील सर्व शिक्षणशास्त्र महाविद्यालये | प्राचार्य, शासकीय अध्यापक महाविद्यालय, परभणी |
| ३ | शिक्षणशास्त्र | लातूर जिल्हयातील सर्व शिक्षणशास्त्र महाविद्यालये | प्राचार्य, अभिनव अध्यापक महाविद्यालय, लातूर |
| ४ | शिक्षणशास्त्र | हिंगोली जिल्हयातील सर्व शिक्षणशास्त्र महाविद्यालये | प्राचार्य, संत गाडगेबाबा अध्यापक महाविद्यालय, हिंगोली. |
| ५ | शारीरिक शिक्षण | विद्यापीठ परिक्षेत्रातील ४ जिल्हे | संचालक, शिक्षणशास्त्र संकुल, विद्यापीठ परिसर |
| ६ | BSW | विद्यापीठ परिक्षेत्रातील ४ जिल्हे | प्राचार्य, जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय, सिडको नांदेड |
| ७ | MSW | विद्यापीठ परिक्षेत्रातील ४ जिल्हे | संचालक, समाजशास्त्र संकुल, विद्यापीठ परिसर |
| ८ | पत्रकारिता | विद्यापीठ परिक्षेत्रातील ४ जिल्हे | संचालक, माध्यमशास्त्र संकुल, विद्यापीठ परिसर |
| ९ | B.Lib. & M.Lib. | विद्यापीठ परिक्षेत्रातील ४ जिल्हे | प्राचार्य, संत संभाजी शिंदे माहिती व ग्रंथालयशास्त्र महाविद्यालय, परभणी. |
| १० | Fashion BA, MA | विद्यापीठ परिक्षेत्रातील ४ जिल्हे | प्राचार्य, दयानंद कला महाविद्यालय, लातूर |
| ११ | Animation | विद्यापीठ परिक्षेत्रातील ४ जिल्हे | प्राचार्य, दयानंद कला महाविद्यालय, लातूर |

**स्वा/-**
**प्र-संचालक**
परीक्षा व मूल्यमापन मंडळ